

# कोकोंकुमां

: लेखिका :

सौ. मालतीबाई मराठे

स. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
326
BVBK-0400326

जयहिंद प्रकाशन
माधवबाग, मुंबई

मूल्य ६० पैसे

बालमित्रांनो,

जय हिंद प्रकाशनतर्फे प्रसिद्ध केलेल्या प्रत्येक पुस्तकाचे आपण उत्साहाने स्वागत केलेत. प्रत्येक पुस्तकाच्या दोन तीन आवृत्त्या संपल्या तरीही मागणी वाढतच आहे. या वर्षी आम्ही आपणाला दहा नवीन पुस्तकांची भेट देणार आहोत. तसेच एक कादंबरिकाही प्रसिद्ध करीत आहोत. नवीन पुस्तकेही आपणाला आवडतील अशी खात्री आहे.

तुमच्या परीक्षा आता संपल्या असतील. सुटीमधे काय काय करायचे याचे बेतही तुम्ही आखले असतील. आपल्या जवळच्या दुकानदाराकडून आमची नवीन पुस्तके विकत घ्या व सुटीचा आनंद लुटा.

आपला मित्र

रवींद्र

---

मुद्रक : वि. ज. देसाई
वैभव प्रिंटिंग प्रेस, मुंबई ४००००४

प्रकाशक : र. ग. रायकर
जय हिंद प्रकाशन, मुंबई ४००००२

मुखपृष्ठ : चित्रकार पोतदार

नवीन आवृत्ती : १ जुलै १९७८

BVBK-0400326

# कोकोंकुमा

एक अरण्य होतं. घनदाट. उंच उंच झाडं. एक वडाचं झाड तर प्रचंड होतं. इतकं की पारंब्या जमिनीला भिडून पुन्हां झाड उगवलं होतं. झाडाच्या ढोलींत एक खार राहात होती. गोजिरवाणी, चिटुकली, झुबकेदार शेपटीवाली. झाडावर एक छानदार घरटं बांधून कावळी राहात होती. काळी कुळकुळीत पण भोळीभाबडी. त्या दोघींची जानी दोस्ती होती. कावळीला कांही मिळालं की ती खारीला आणून द्यायची आणि खारही तसंच कांहींतरी देऊन परतफेड करायची.

कधीकधी खार तुरुतुरु झाडावर चढून कावळीच्या बिऱ्हाडीं यायची. मग दोघींच्या खूप गप्पागोष्टी चालायच्या. खार गोजिरवाणी दिसत असली तरी होती मात्र ढालगज भवानी. फार हुषारी दाखवायची. तिला मोठा गर्व होता. कशाचा माहीत आहे ? तिच्या पाठीवर तीन बोटांची खूण होती ती प्रत्यक्ष प्रभू रामचंद्राच्या शाबासकीमुळं आलेली आहेत असं ज्याला त्याला सांगायची ती आणि मोठेपणा मिरवायची.

एकदां अशाच गप्पा गोष्टी चालल्या होत्या. तेव्हां ती कावळीला म्हणाली, ‘ बाई ग तूं किती भोळी आहेस ? जग कसं मतलबी आहे तुला कांहीं सुद्धां कळत नाहीं. त्या कोकि-

ळेचा कावा तुझ्या लक्षांत तरी आला असेल की नाहीं कोण जाणे.'

कावळीला कांहींच समजलं नाही. पण खार आपल्यापेक्षां हुषार आहे. नेहमी चतुराईच्या गोष्टी सांगते तेव्हां ती सांगते तें खरंच असणार असं समजून कावळीचा खारीवर पटकन विश्वास बसला. तिनं विचारलं,

'कसला कावा? नीट सांग ना बाई, माझं कांही चुकतं आहे का?'

खार हंसली मनापासून. आणि शेपटी झुपकावीत म्हणाली, 'सांगते ऐक, कोकिळा पक्की वस्ताद आहे. तिला नेहमी भटकायला पाहिजे असतं. मैत्रिणी गोळा करते आणि हुंदडत असते. आणि काय करते? आपली अंडी तुझ्या घरट्यांत आणून टाकते. तुला कांही कळत नाही. मग स्वतःच्या पिल्लांबरोबर तूं तिच्याही पिल्लांच्या खस्ता खातेस. पण त्याचं कांही चीज होतं कां?'

कावळीला लगेच पटलं. ती म्हणाली, 'बरं झालं खारुताई, तूं मला सावध केलंस. येऊं दे आतां तिला. चांगली धमकावते बघ.'

म्हणतांक्षणी कोकिळा बोलावल्यासारखी हजर झाली. खार होतीच तिथे. तिनं कावळीला चांगलंच फितवलं होतं. मग

काय ? दोघींनी मिळून कोकिळेची चांगलीच हजेरी घेतली. खार म्हणाली, "कोकिळ, तूं नुसती ऐतोबा आहेस, तुझा गोड गळा आहे म्हणून मिजास केवढी मारतेस ग ? मग त्या राघूनाना आणि मैनामावशींसारखी प्रवचनं आणि भजनं कां करीत नाहीस ?'

आपल्यावर अचानक हा हल्ला आज कशासाठी तें कोकिळेला कळेना. ती गांगरून म्हणाली, 'म्हणजे काय ? मला फक्त गाणी गातां येतात, प्रवचनं करतां येत नाहीत. म्हणून काय झालं ? ज्याला जें जमतं तेंच त्यानं करावं.'

त्यावर कावळी तावातावानं म्हणाली, 'ठीक आहे, जें येतं तेंच करावं पण आपल्याजवळ असलेल्या देणगीचा दुसऱ्याला उपयोग व्हावा. तसा नाही झाला तर आयुष्य फुकटच म्हणायचं.'

'उपयोग व्हायला हवा म्हणजे करायचं काय ?'

'काय म्हणजे ? आकाशवाणीवरच्या 'प्राणीसभें'त त्या दोघांना वरचेवर बोलावून घेतात. एकदां तरी तुझी वर्णी लागलीय कां तिथं ? त्यांचे खूपखूप कार्यक्रम होतात. सगळ्यांना आवडतात. तुझा एक तरी झाला आहे ?'


कोकिळा मनांतल्या मनांत कष्टी झाली. या दोघींनी नेमकं वर्मावरच बोट ठेवलं होतं की. पण कुठलीही गोष्ट मिळवण्या-

साठी कष्ट करावे लागतात आणि कोकिळा तर आरामशीर-पणाला सरावलेली. तेवढ्यांत खार मुद्दामहून लाघटपणानं म्हणाली, 'आणि काय पण तुझ्या मैत्रिणी ? कुत्री, मांजरी आणि कोंबडी मूर्ख आहेत अगदी. त्यांना काय कळतंय ? त्या आपल्या तुझ्या गाण्याला माना डोलावतात आणि तूं फुशारून जातेस.'

कोकिळा खिन्न झाली. असलं कांहीं आजवर कुणी बोललं नव्हतं. कावळी तर कधीच बोलली नव्हती. या खारोळीनं शिकवलेलं दिसतंय सगळं. नाहीतर कावळी बिचारी गरीब. निमूट आपल्या पिल्लांची देखभाल करायची. कोकिळा तिथून उठली आणि म्हणाली,

'ठीक आहे, माझंही गाणं तुम्हांला केव्हा तरी 'प्राणी-सभे'च्या कार्यक्रमांत ऐकायला मिळेल. मी आतां जाते. काऊताई, परत तुला त्रास द्यायला येणार नाही. पण एक लक्षांत ठेव या ढमाल्या खारूताईच्या जास्त नादीं लागूं नकोस. तुझं तूं नुकसान करून घेशील.'

कोकिळा निघाली. तिच्या मनांत विचार चालूं होता. काय करावं ? कुणाला विचारावं ? आपल्या मैत्रिणींचा सल्ला घ्यावा का ? चालतां चालतां वाटेंत तिला मांजरी भेटली. मग दोघीजणी कोंबडीच्या खुराड्याशीं आल्या. थोड्या वेळानं कुत्रीही तिथं आली. कोकिळा दुःखी होऊन म्हणाली,



‘ ऐका गडे, मी आतां दुसरीकडे जाणार आहे. मग पुष्कळ दिवस आपली भेट होणार नाही. ’

कोकिळेनं घडलेली सारी हकीकत तिघींना सांगितल्यावर त्याही तिच्याबरोबर जायला निघाल्या. मांजरी म्हणाली,

‘ मला सुद्धां इथून आतां जायलाच हवं आहे. ’

‘ कां ? तुझी मालकीण तर तुझे खूप लाड करायची ना ? ’

‘ हो ग, इतके दिवस घरांतल्या उंदरांचा फन्ना करीत होते

ना म्हणून खूष होती माझ्यावर. मला रोज दूधभात जेवायला देत होती.'

'मग आतांच काय एवढं बिघडलं?'

'आतां तिची सासू आलीय तिच्याकडे राहायला आणि तिला म्हणे मांजरं मुळीच आवडत नाहीत. काल सुनेला सांगत होती.'

'काय सांगत होती?'

'सारखी पायांत अडमडते, दुधावरची साय फस्त करते. हिला पोत्यांत घालून समुद्रांत बुडवा बरं.'

'बाई ग, वरीच आहे की म्हातारी! मग तूं काय केलंस?'

'मी जीव घेऊन पळाले ग. म्हटलं दुसरीकडे जाऊं, इतर गांवं काय ओस पडली नाहीत.'

ही झाली मांजरीची गोष्ट. कुत्रीचीही तशीच रडकथा होती. तिच्या मालकीणबाई नव्या घरांत राहायला जाणार होत्या. तें घर एका मोठ्या कॉलनींत होतं, आणि त्यांच्या नियमाप्रमाणे कुणालाही घरांत कुत्रं, मांजर, पोपट वगैरे पाळायला परवानगी नव्हती. त्यामुळे मालकानं सांगितलं,

आतां चम्पे, तुला कांहीं आम्ही बरोबर नेणार नाही बरं

का. आतां इथं दुसरं कुणांतरी येईल राहायला त्यांच्याकडे राहा '

' मग ? तूं काय ठरवलं आहेस ? '

' राहिले असतें. पण आतां तुम्ही दोघी पण गांव सोडून जायचं म्हणतां मग मी तरी कशाला इथं राहूं ? नवं बिऱ्हाड तरी कसं येतंय कुणाला माहीत ? मी आपली तुमच्याबरोबरच येईन. '

कोंबडी तर भलतीच घाबरून गेली होती. त्या दिवशी तिच्या मालकाकडे मोठी मेजवानी होती. मालकीणबाईंना पाहुण्यांसाठी चांगला, झणझणीत मसालेदार रस्सा बनवायचा होता. तिनं याच कोंबडीचा वापर करायचं ठरवलं होतं. नोकराला तिनं तशी सूचनाही देऊन ठेवली होती. त्यामुळे आपला जीव कसा वाचवावा म्हणून कोंबडी काळजी करीत होती. तेवढ्यांत अनायासे आपल्या तिघी मैत्रिणी गांव सोडून जाताहेत हें पाहिल्यावर ती तर एका पायावर घर सोडायला तयार झाली.

अशा रीतीनं चौघी मैत्रिणी एकत्र आल्या, आणि ताबडतोब दुसऱ्या कुठल्यातरी गांवी जायला निघाल्या. कोकिळा म्हणाली,

' बरं का ग, त्या राघूनाना आणि मैनामावशीचा एवढा रुबाब नको. मी तुम्हांला गाणी शिकवीन. शिकवल्यावर काय

कुणालाही येतं. आपण आकाशवाणीसाठी आपलाही एक कार्यक्रम तयार करूं या म्हणजे त्या खारकुंडीला आपलं महत्त्व कळेल.'

मग त्या कार्यक्रमाविषयीच नाना तऱ्हेचे बेत ठरवीत चौघीजणीं जात असतांना वाटेंत त्यांना एक घर दिसलं. होतं छोटंसंच. मागे विहीर होती. पुढे छोटीशी बाग होती. तुळशीवृन्दावन होतं. मंजिऱ्या घमघमत होत्या. आंब्याची झाडं होती. इतरही पुष्कळ फळझाडं, फुलझाडं होती.

वृन्दावनापासून थोड्या अंतरावर एक छोटं दत्ताचं देऊळ होतं. समोर स्वच्छ सारवलेली जमीन होती. आणि सुंदर रांगोळी काढलेली होती. या चौघी मैत्रिणी अंगणांत आल्या. आणि एक छोटी मुलगी हातांत परडी घेऊन फुलं वेंचायला बागेंत आलेली त्यांना दिसली. तिच्या पाठोपाठ एक म्हातारी काठी टेकीत टेकीत आली आणि त्या मुलीला म्हणाली,

'गुणकली, आज आपल्याला लौकर लौकर कामधंदा उरकायला हवा बरं का. आणि घराचा नीट बंदोबस्त करायला हवा. तुझे आजोबा म्हणत होते की शेजारपाजारच्या गांवामध्ये दरवडेखोरांनी धुमाकूळ घातला आहे. आपल्या घरावर सुद्धां कधी धाड पडेल नेम नाही.'

गुणकली शहाणी होती. आजीला कां काळजी वाटते तें ती जाणून होती. पण तरीही धीर द्यावा म्हणून ती म्हणाली,

'आजी, तूं कांहीं काळजी करूं नकोस. आपण एवढी दत्तगुरूची पूजा करतो. दरवडेखोर आपल्या केसालाही धक्का लावणार नाहीत. अग, आजोबा परवां सांगत नव्हते का? देव आपलं कुठल्यातरी रूपानं येऊन रक्षण करील बघ.'

पण म्हातारीची काळजी कशी कमी होणार? तिला नीट दिसत नव्हतं. तिच्या डोळ्यांत फूल पडलं होतं. आणि आजोबा फार थकले होते. त्यांच्या हातापायांत बळ राहिलं नव्हतं. गुणकली हा एकटाच त्यांचा आधार होता.

गुणकलीचे आईवडील यात्रेला गेले होते तेव्हां स्नानासाठी नदींत उतरले आणि मोठ्या लाटबरोबर वाहून गेले. त्यांच्याबरोबर कांहीं माणसं आधीच कांठावर आली होती. त्यांनी मोठ्या दुःखानं आजी-आजोबांना ही बातमी दिली. तेव्हां गुणकली लहान होती.

तेव्हांपासून शेतीभातीच्या उत्पन्नावर आणि घरातलं किडूक मिडूक विकून येईल त्याच्यावर तिघांची कशीबशी गुजराण चालत होती. आणि गुणकलीचं लग्न झालं की आपण जबाबदारीतून मोकळे होऊं असं त्यांना वाटत होतं.

एकदां एक ज्योतिषी आला होता. त्यानं गुणकलीची कुंडली मांडली आणि सांगितलं, 'ही मुलगी भाग्यवान आहे. हिला चांगलं स्थळ चालून येणार आहे. तुम्ही देवाची भक्ति करतां आहांतच. हिला रोज तुळशीची पूजा करायला सांगा.'

आजी-आजोबांना खूप आनंद झाला. कधी एकदां तो दिवस उगवेल आणि आपण हिला सुखांत नांदताना पाहूं याची वाट तें पाहूं लागले. गुणकली सर्वांना आवडायची. ती सुंदर होतीच पण गुणीही होती. आपल्या कोकोंकुमां मंडळालाही ( कोकिळा, कोंबडी, कुत्री, मांजरी ) ती खूप आवडली.

आजीचं आणि नातीचं बोलणं त्यांनी ऐकलं होतंच. त्यामुळे तिथंच राहावं असं चौघींनी ठरवून टाकलं. मग आपल्या परीनं प्रयत्न करून दरवडेखोर आलेच तर त्यांना हुसकून कसं लावायचं याबद्दल चौघींनी मिळून एक बेत ठरवला. मांजरी शेपटी हलवीत म्हणाली,

' माझ्या पावलांचा जरा सुद्धां आवाज होत नाही आणि मला अंधारात छान दिसतं. कुणी आंत आलं की मी त्याला चांगलं बोचकारून काढीन.'

कुत्री काय कमी होती ? कांहीं झालं तरी तिचा जोडीदार कुत्रा शिकारी कुत्रा होता. तीही मांजरीला म्हणाली,

' मला सुद्धां वासावरून माणूस शोधून काढतां येतं. मी दरवडेखोराच्या पायाचा लचकाच तोडीन. त्याला मुळीच निसटूं देणार नाही. '

कोंबडी क्षणभर विचारांत पडली. या दोघी दरवडेखोरांच्या अंगावर धांवून जातील. आपल्याला कांहीं तें जमणार नाही. मग ती म्हणाली, ' मी आपली जोरजोरांत ओरडून त्यांना घाबरवून सोडीन. म्हणजे ते बिचकतील आणि सैरावैरा पळायला लागतील. '

कोकिळेला आपल्या मैत्रिणींची योजना खूपच आवडली. ती खूष होऊन म्हणाली,

' वा, छान ! तुमची तिघींचीही कल्पना खरंच चांगली आहे. आतां मी काय करीन सांगूं ? मी उंच आंब्याच्या झाडावर बसून राहीन. आणि दुरून कुणी येतांना दिसलं की ' कुहू कुहू ' असं ओरडून तुम्हांला सावध करीन. '

अशा रीतीनं चौघींनीही आपापली कामं वाटून घेतली. सगळ्यांनी ठरवलेल्या गोष्टी चोख केल्या म्हणजे दरवडेखोर पळून जातील. मग गुणकली शाबासकी देईल. आणि मग याच घरांत आपल्याला आनंदानं राहातां येईल असा विचार त्यांच्या मनांत होताच.

संध्याकाळ झाली. सूर्य मावळतीच्या दिशेला निघून गेला. कोकिळेने पुन्हां एकदां बाकीच्या तिघींना कसंकसं कायकाय करायचं तें समजावून सांगितलं. आणि ती उंच आंब्याच्या झाडावर जाऊन बसली.

रात्र झाली. जेवणंखाणं झाली. मग आजी, आजोबा आणि गुणकली मागची कामं आवरून बिछान्यावर जाऊन पडली. गुणकली लहान असल्यामुळे तिला चटकन झोप लागली पण त्या वृद्ध जोडप्याला झोप येईना. मग दोघांनीही जपमाळ घेतली आणि दत्तगुरूचा जप सुरूं केला. मनोमन प्रार्थना केली,

‘ देवा. आम्ही आतां पिकली पानं झालेली आहोत. पण आमच्या नातीचं उभं आयुष्य जायचं आहे. संकटातून निभावून ने बाबा. ’

इतक्यांत लांबून कसलीतरी चाहूल आल्याबरोबर ‘कुहूकुहू’ असा आवाज ऐकूं आला. आजोबा मनांत म्हणाले, ‘यावेळी कुठे कोकिळा ओरडायला आली ? ’ पण आवाज ऐकल्याबरोबर मांजरी, कुत्री आणि कोंबडी तिघीही सावध झाल्या. मांजरी देवळाच्या गाभाऱ्यांत बसली होती. कोंबडी बाजूच्या भिंतीलगत होती, आणि कुत्री दाराशीच होती. तिघीही आपापल्या जागी ठाम.

दरवडेखोर चांगले चारपांच होते. या घरांत एक छोटी मुलगी आहे आणि दोन गलितगात्र झालेली माणसं आहेत. आपल्याला कुणी प्रतिकार करणार नाही याबद्दल त्यांची खात्री होती. त्यामुळे ते निर्धास्तपणानं फरशी कुऱ्हाड कांहीं न घेतां आले होते. त्यांचा नायक आपल्या साथीदारांना म्हणाला,

'कठीण कांहीं नाही. म्हातारा-म्हातारी तर आहेत. तोंडांत बोळा कोंबला की अर्धमेली होतील, आणि त्या पोरीच्या दोन तोंडांत द्यायच्या की घाबरून निपचित पडेल. आपलं काम झालं की जाताना बोळा काढून टाकू फारतर.

म्हणून मग तो नायक दारावर लाथा मारायला लागला. तेवढ्यांत कुत्रीने त्याच्या पायाचा लचका तोडला. तो 'ओय ओय' करीत ओरडत पळाला. पण त्याच्या धोतराची एक चिंधी कुत्रीला मिळालीच. तिने त्याचा वास पक्का ध्यानांत ठेवला.

त्याचा एक साथीदार मागे होता. दत्ताच्या देवळांत मांजरी होती. अंधारांत तिचे डोळेच तेवढे चमकत होते. समईच्या ज्योतीच हळुहळु विझत आलेल्या असाव्यात असं त्याला वाटलं. म्हणून तो पुढे झाला आणि समईला पूर्णपणे निरोप द्यावा म्हणजे देवापुढचे पैसे पळवताना आपल्याला कुणी बघणार नाही असं वाटून त्याने हात पुढे केला, आणि तेवढ्यांत मांजरीने उडी घेतली. तो घाबरून पळायला लागला. पण तिने त्याच्या तोंडाला, मानेला, गळ्याला चांगलंच बोचकरून काढलं.

आणखी एकजण बाजूच्या खिडकींत चढून गजावर हात धरून उभा होता. कशाचा तरी आधार घेऊन कौलारावर चढावं आणि कौल बाजूला सारून घरांत उडी मारावी असा त्याचा विचार होता. तेवढ्यांत तिथं असलेली कोंबडी

'कुकूचकू कुकूचकू' असं जोरजोरांत ओरडायला लागली. त्याबरोबर तो एकदम दचकला आणि गजावरचा त्याचा हात निसटून तो दाणदिशीं खाली आपटला. या सगळ्या गडबडींत इतर दोघे भांबावून गेले आणि सैरावैरा धांवत सुटले.

त्याचवेळी कोकिळेनं परत एकदां 'कुहूकुहूं'चा इशारा दिला. आणि मग तिचं 'कुहू', कुत्र्यांचं 'भूः भूः' मांजरीचं 'म्यांव म्यांव' आणि कोंबडीचं 'कुकूचकू' एकाच वेळी तालासुरांत ऐकूं यायला लागलं. तो संमिश्र आवाज ऐकून गुणकलीला जाग आली.

ती उठली. तिनं दिवा मोठा केला. बघते तो आजीआजोबा घाबरून गेलेले आणि भिंतीला चिकटून थरथर कापत उभे असलेले तिला दिसले. त्याबरोबर गुणकली एकदम जोरांत 'धांवा, धांवा, लौकर कुणीतरी या' असं ओरडली आणि दाराकडे धांवत गेली.

अंगणांत जोरजोरांत कुणीतरी पळत असल्याचे आवाज येत होते. घाबरून ओरडल्याचे आवाज येत होते. त्याच वेळी फाटकातून दोन तरुण आंत आले. त्यांच्या हातांत शस्त्रें होतीं. त्यांनी दरवडखोरांना पाहिलं होतं. गुणकलीचे धांवा धांवा शब्द त्यांनी ऐकले होते. बाहेर त्यांचे घोडे उभे होते तेही या कोलाहलानं खिंकाळायला लागले होते. ते दोघे कोण

होते माहीत आहे ? त्यांतला एकजण दुसऱ्या नगरांतल्या मोठ्या जहागिरदाराचा मुलगा होता. आणि दुसरा त्याचा मित्र होता.

ते दोघं कुठलीतरी कामगिरी पार पाडून आपल्या घरीं चालले होते. आणि नेमके त्याच वेळी तिथं आले होते. गुणकलीनं दार उघडल्याबरोबर ते दोघे पुढे झाले. आणि तिला पाहून आश्चर्यानं चकित झाले. जहागिरदाराच्या मुलानं विचारलं,

'तूंच आतां ओरडलीस नं ? घरांत दुसरं कोण आहे ?'

'माझे आजी आजोबा आहेत. पण तुम्ही कसे नेमके देवानं पाठवल्यासारखे आलांत ? तुम्हीच त्या चोरांना पिटाळून लावलंत कां ?'

तेवढ्यांत मांजरी, कुत्री, आणि कोंबडीही त्यांच्याभोवती गोळा झाल्या. त्यांचं समूहगीत त्या दोघांनीही ऐकलेलं होतंच. कुत्रीच्या तोंडात अजूनही धोतराची चिंधी होतीच. जहागिरदाराचा मुलानं खरा प्रकार जाणला. तो म्हणाला,

'यांच्यामुळं दरवडेखोरांनी सूं बाल्या ठोकला वरं का. हें बघ इथं रक्त सांडलंय. या कुत्रीनं त्याच्या पायाचा तुकडा

मोडलेला दिसतोय. या मांजरीनं नक्की कुणाला तरी बोचकारलं असणार आणि हें खिडकीखालचं झाड मान मोडून पडलेलं दिसतंय. कोण याच्यावर धडपडलं असेल ? '

गुणकलीच्याही सगळं लक्षांत आलं. कोण कुठून येतं आणि आपल्याला मदत करतं. मुके प्राणी खरं म्हणजे पण त्यांनीच आपल्याला वाचवलं आज. देवानंच त्यांना धाडलं की काय ? गुणकलीनं मोठ्या प्रेमानं त्याच्या अंगावरून हात फिरवला. कोकिळा आंब्याच्या झाडावर बसून सगळा प्रकार पाहात होतीच. तीही मोठ्या आनंदानं ' कुहू कुहू ' करूं लागली.

संकट दूर पळालं होतं. सगळीकडे आनंदीआनंद झाला होता. गुणकली दोघा मित्रांना घेऊन घरांत गेली. आपल्या नव्या मैत्रिणींना ती विसरली नाही. तिनं त्यांना ओसरीवर एका कोपऱ्यांत बसायला सांगितलं. कोंबडीपुढे मूठभर धान्य आणून टाकलं. कुत्रीला भाकरीचा तुकडा दिला आणि मांजरीला वाटींत दूध दिलं.

आजी आजोबा पाहुण्यांशीं बोलत होते. त्यांची चौकशी विचारपूस करीत होते. आजीनं गुणकलीला सांगितलं,

' बाळा, पाहुण्यांना तांब्याभरून पाणी आणून दे. फुलपात्रीं स्वच्छ धुवून ठेव हो आणि ताटलींत त्या डब्यांतले चार



मूगलाडू पण घेऊन ये. पाहुणे लांबून आले आहेत. घरी पोहोचायला त्यांना उशीर होईल.'

गुणकलीनं आजीच्या सांगण्याप्रमाणें सर्व नीट केलं. ती लाजेनं लाल झाली होती. तिला तो उमदा मुलगा मनापासून आवडला होता. त्यालाही पाहातांक्षणीं ती आवडली होती. या योगायोगाच्या गोष्टी असतात. एकमेकांशी ती दोघं बोलत होती, हंसत होती. त्यांना बघून आजोबांना ज्योतिष्यानं सांगितलेल्या भविष्याची आठवण झाली. म्हणजे हिचा भावी पती घर चालून येणार असं कळलं होतं तो हाच की काय? आजोबांनी त्याला विचारलं,

' माझ्या नातीला तुम्ही पाहातांच आहांत. ती तुम्हांला पसंत असेल तर तुम्ही तिचा स्वीकार कराल कां ? '

हें ऐकल्याबरोबर गोड हंसून गुणकली लाजली आणि घरांत पळाली. जहागिरदाराचा मुलगा म्हणाला,

' मला तुमची नात आवडली आहे. मी घरी जातो. वडिलांच्या कानावर घालतो, आणि तुम्हांला निरोप धाडतो. '

मग यथावकाश सगळ्या गोष्टी सुरळीत पार पडून दोघांचं लग्न झालं आणि सगळ्या गोष्टींमध्ये घडतं त्याप्रमाणे नंतर दोघे सुखानं नांदू लागले.

' चतुर चौघीं'नी नंतर काय केलं ? या सर्व प्रसंगावर एक कार्यक्रम तयार केला, आणि ' प्राणीसभें 'त सादर केला. तो ऐकल्यावर कावळी आणि खारोळी खजिल झाल्या.

आणि नंतर हे चतुर चौघींचं ' कोकोंकुमां ' मंडळही आजीआजोबांच्या आणि दत्तगुरूच्या सान्निध्यांत सुखानं राहूं लागलं.

— समाप्त —

326
BVBK-0400326